स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन
समाज कल्याण आयुक्तालय, ३ चर्च पथ, महाराष्ट्र राज्य, पुणे १.
दूरध्वनी क्र .२०-२६१२२७५२ ईमेल - sakalyanpuneest@gmail.com

| | | |
|---|---|---|
| वाचा | १ | महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५. |
| | २ | अधिसूचना शासन आदेश क्र. सकआ-२०१२/ प्र.क्र.२६३/ आस्था-२, दि. २० ऑक्टोंबर २०१२. |
| | ३ | सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. एस. आर. व्ही. २०१७/ प्र. क्र. ४१५/ का-१२, दिनांक ९ एप्रिल २०१८. |
| | ४ | नागरी सेवा मंडळ (२) बैठक दिनांक २२.०५.२०२३ |

क्र.सकआ /आस्था-२/ कार्या.अधिक्षक/ प्रशा-विनंती बदली/ २०२३-२४ / पुणे, 2573 दि२१.६.२०२३

# -: आदेश :-

संदर्भ क्र. १ नुसार बदल्यांच्या अधिनियमातील तरतुदीनुसार व संदर्भ क्र. ३ अन्वये आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना गट-क संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्याबाबतचे अधिकार प्रदान केलेले आहेत. गट-क संवर्गातील कर्मचाऱ्यांची, पदस्थापना, बदली याबाबत सक्षम प्राधिकाऱ्यास शिफारशी करण्यासाठी नागरी सेवा मंडळ (२) स्थापन केलेले आहे.

संदर्भ क्र. ४ अन्वये सदर नागरी सेवा मंडळाने केलेल्या शिफारशी विचारात घेऊन आयुक्त, समाज कल्याण महाराष्ट्र राज्य, पुणे हे शासन आदेशानुसार प्रदान केलेल्या अधिकाराच्या अधिनराहून **कार्यालय अधिक्षक** या संवर्गातील खालील कर्मचाऱ्यांचे प्रशासकीय/ विनंती बदलीने पदस्थापनेचे आदेश निर्गमित करीत आहेत.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव व कार्यालयाचे नाव | प्रशासकीय /विनंती बदलीने पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|
| १ | श्रीमती पी.आर.घटारे, कार्यालय अधिक्षक इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय,महाराष्ट्र राज्य पुणे | जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर येथील कार्यालय अधिक्षक या रिक्त पदावर प्रशासकीय कारणास्तव बदलीने पदस्थापना |
| २ | श्री एस.एस. माचरे, कार्यालय अधिक्षक जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर | सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण सोलापूर येथील कार्यालय अधिक्षक या रिक्त पदावर प्रशासकीय कारणास्तव बदलीने पदस्थापना |
| ३ | श्री. पी. एस. गोहते, कार्यालय अधिक्षक जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परीषद नागपूर. | सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, नागपूर येथीलकार्यालय अधिक्षक या रिक्त पदावर विनंती बदलीने पदस्थापना |
| ४ | श्री. एम. एन.मोरे, कार्यालय अधिक्षक जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परीषद धुळे | सहाय्यक आयुक्त समाज कल्याण पालघर येथील कार्यालय अधिक्षक या रिक्त पदावर विनंती बदलीने पदस्थापना |

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव व कार्यालयाचे नाव | प्रशासकीय /विनंती बदलीने पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|
| ५ | श्री आर.व्ही. सुरकुटलावार, कार्यालय अधिक्षक<br>सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, नांदेड. | सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, लातूर येथील श्रीमती लाखाडे, कार्यालय अधिक्षक यांच्या पदोन्नतीने रिक्त होणाऱ्या पदावर विनंतीने पदस्थापना. |
| ६ | श्री ए.ए. घुगे, कार्यालय अधिक्षक<br>सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, बीड | जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर येथील श्री माचरे, कार्यालय अधिक्षक यांच्या प्रशासकीय बदलीने रिक्त होणाऱ्या पदावर विनंती बदलीने पदस्थापना |

वरील प्रमाणे प्रशासकीय/विनंती बदली झालेल्या कार्या. अधिक्षक यांना दिनांक २९.०६.२०२३ रोजी मध्यान्होत्तर कार्यमुक्त करण्यात येत आहे.

तसेच वरील कर्मचाऱ्यांच्या विनंतीने बदली करण्यात आली असल्याने त्यांना बदली प्रवास भत्ता व पदग्रहण अवधी लागू राहणार नाही.

सदरच्या बदली आदेशाची अंमलबजावणी तात्काळ व कार्यक्षमरित्या होण्याकरीता खालील सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

१. बदली झालेले कर्मचारी यांना हयाच आदेशात कार्यमुक्त करण्यात आल्याने रुजू होण्यासाठी आल्यानंतर त्यांना विनाविलंब रुजू करुन घ्यावे. एखादया कर्मचाऱ्यास रुजू करुन न घेतल्यामुळे सक्तीचा प्रतिक्षा काळ ठरवून काम न देता वेतन व भत्ते देण्याचा प्रसंग उद्भवल्यास संबंधीत कार्यालय प्रमुख यांना जबाबदार धरण्यात येईल.
२. बदली झालेल्या कर्मचारी यांनी तात्काळ बदलीच्या ठिकाणी हजर व्हावे. सदर कर्मचारी हे सदर पदावर हजर न झाल्यास त्यांचा सदरचा कालावधी सेवाखंड कालावधी म्हणून गणना करण्यात येईल व त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत कर्मचारी यांची राहील.
३. बदली आदेशात बदल करुन घेण्यासाठी कोणत्याही कर्मचाऱ्याने प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास असे कर्मचारी शिस्तभंग विषयक कारवाई करण्यास पात्र ठरतील.

सदर आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

29.6.2023

(डॉ. प्रशांत नारनवरे)
आयुक्त, समाज कल्याण,
महाराष्ट्र राज्य,पुणे.

**प्रत माहितीस्तव सादर.**
१.मा. अपर मुख्य सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय मुंबई ३२.
२. मा. महालेखापाल, मुंबई / नागपूर.
**प्रत: माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित.**
१. आयुक्त, दिव्यांग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. संचालक, इतर मागासवर्ग बहुजन कल्याण संचालनालय पुणे ३.मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (संबंधित)

४. अतिरिक्त आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
५. सह आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, पुणे (संबंधित)
६. उप आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, पुणे (संबंधित)
७. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, (सर्व)
८.सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, (संबंधित)
९. जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद (संबंधित)
१०. कोषागार अधिकारी, (संबंधित)
११.संबंधित कर्मचारी.

29.6.2023

**आयुक्त, समाज कल्याण,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**